**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587



दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे    सहसंपादक : तुकाराम कामठे



या गुढी पाडव्याला आपल्या घराला द्या नवीन आणि आधुनिक साज!
**इंटेरिअर डिझायनर श्रेया निलाखे**
**घर, फ्लॅट व ऑफिससाठी आकर्षक आणि आधुनिक इंटेरिअर डिझाईन.**
- आधुनिक व मिनिमल डिझाईन
- स्मार्ट स्पेस प्लॅनिंग
- बजेटमध्ये सुंदर इंटेरिअर सोल्युशन्स


संपर्क: 75-59-26-16-75



वर्ष ५ । अंक १९२ । सोमवार २० एप्रिल २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २   https://epaper.dainkaakarshan.com   E-mail- dainikaakarshan@gmail.com   RNI NO. MAHMAR/2021/84322


## मृत्यूपासून वाचण्यासाठी अरुणकाकांप्रमाणे दुसऱ्यांच्या विचारात जिवंत रहा - डॉ. कुमार विश्वास

**स्व.अरुणकाका जगताप यांच्या स्मरणार्थ अपने अपने राम राम कथा पहिल्याच दिवशी रंगली**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** श्रीराम व श्रीकृष्ण आले अन गेले ही. विश्व त्यांच्या शोकात राहिले नाही. त्यामुळे मृत्यू कोणालाही चुकलेला नाही, मात्र, मृत्यूपासूनही वाचता येते व दुसऱ्याच्या विचारात जिवंत राहता येऊ शकते. पण, त्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी व छत्रपती शिवरायांसारखे लोकोत्तर जीवनकार्य करायला हवे, असे आवाहन प्रसिद्ध कवी व रामकथाकार डॉ. कुमार विश्वास यांनी रविवारी सायंकाळी अहिल्यानगरमध्ये केले. अहिल्यादेवी व छत्रपती शिवरायांच्या विचारांना आदर्श मानून आयुष्यभर सामाजिक व धार्मिक काम केलेले स्वर्गीय माजी आमदार अरुणकाका जगताप त्यामुळेच अहिल्यानगरवासियांच्या मनात व विचारात जिवंत आहेत, असा विश्वासही विश्वास यांनी व्यक्त केला.

माजी आमदार स्वर्गीय अरुणकाका जगताप यांच्या प्रथम वर्षश्राद्धानिमित्त येथील काका ट्रस्ट व जगताप परिवाराच्या वतीने डॉ. कुमार विश्वास यांच्या अपने अपने राम या प्रसिद्ध राम कथेचे आयोजन आनंदधाम रस्त्यावरील राष्ट्रीय पाठशाळा मैदानात करण्यात आले आहे. त्याचे प्रथम पुष्प गुंफताना डॉ. विश्वास यांनी राम कथा कशी प्रत्येकाच्या जीवनाशी निगडित आहे याचे दाखले देत सविस्तर विवेचन केले. यावेळी विधान परिषदेचे सभापती प्राध्यापक राम शिंदे, भाजपा प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे, आमदार सत्यजित तांबे, जिल्हा सहकारी बँकेचे अध्यक्ष चंद्रशेखर घुले, पद्मश्री पोपटराव पवार, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव आदी उपस्थित होते. रामकथेचे कथाकार डॉ. कुमार विश्वास यांचे नगरवासीयांच्या वतीने स्वागत व सन्मान श्रीमती पार्वतीबाई जगताप यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची मूर्ती देऊन केले यावेळी डॉ.वंदना फाटके, डॉ.शशीकांत फाटके, सचिन जगताप, आ.संग्राम जगताप, सुवर्णा जगताप, शितल जगताप, परमेश्वरी व आराध्य जगताप आदींसह जगताप परिवराने केले. यावेळी रा.स्व.संघाचे जिल्हा संघचालक वाल्मिक कुलकर्णी, मंदारबुवा रामदासी, अनुराधा नागवडे, बडीसाजन ओसवाल संघाचे अध्यक्ष पेमराज बोथरा, सुनील रामदासी, राजेंद्र चोपडा आदींसह विविध क्षेत्रातील नागरिक व हजारो भाविक उपस्थित होते.

प्रास्ताविकात आ.संग्राम जगताप यांनी सर्वांचे स्वागत केले, ते म्हणाले, वडिलांच्या स्मृतीनिमित्त कर्तव्य भावनेने राम कथेचे आयोजन या पावन संतांच्या भूमीत केले आहे. वडील वैकुंठवासी अरुणकाका जगताप अनेक वर्ष शहराच्या सामाजिक व आध्यात्मिक क्षेत्रात कार्यरत होते. सर्वांच्या आशीर्वादाने विधान परिषदेवर दोन वेळा प्रतिनिधित्व त्यांनी केले. त्यांच्या स्मृती निमित्त त्यांनी ज्या अध्यात्मिक व धर्म क्षेत्रात काम केले, त्या क्षेत्राशी संबंधित उपक्रम करण्याचा आग्रह सर्वांचा होता. आमच्या परिवारात आजोबांपासून कुटुंबात आध्यात्मिक ■ पान ४ वर

## नेवासा तालुका हादरला! ५० लाखांच्या भ्रष्टाचाराचा आरोप केल्याने मुख्याधिकाऱ्यांचा गोळीबाराचा बनाव?

**संजय सुखधान यांच्या समर्थनार्थ नेवासा कडकडीत बंद**

**कमलेश गायकवाड**

**दैनिक आकर्षण । नेवासा–**

भ्रष्टाचाराचे आरोप झाकण्यासाठी प्रशासकीय अधिकाऱ्याने चक्क स्वतःवरच गोळीबाराचा बनाव रचल्याचा धक्कादायक प्रकार नेवासा शहरात चर्चेचा विषय ठरला आहे. आम आदमी पार्टीचे नेते संजय सुखधान यांच्यावर दाखल झालेला ३०७ (जीवे मारण्याचा प्रयत्न) हा गुन्हा पूर्णपणे बनावट असल्याचा दावा करत, आज नेवासा शहर व्यापारी संघटना आणि सर्वपक्षीय नेत्यांनी एकत्र येत शहरात कडकडीत बंद पाळला व तहसीलवर विराट मोर्चा काढला.


**नेमके प्रकरण काय?**

आम आदमी पार्टीच्या नगर पालिका ■ पान ४ वर

### अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांचे स्पष्टीकरण: नेवाशाचा गुन्हा नगरमध्ये का?



**नेवासा पोलीस स्टेशनच्या अगदी जवळ ही कथित घटना घडूनही गुन्हा अहिल्यानगर (नगर) येथे का दाखल करण्यात आला, याबाबत श्रीरामपूर विभागाचे अप्पर पोलीस अधीक्षक श्री. सोमनाथ वाकचौरे यांनी सविस्तर माहिती दिली आहे. संबंधित वरिष्ठ अधिकारी या प्रकारामुळे अत्यंत भयभीत झाले होते, त्यांनी तातडीने आपले वरिष्ठ आणि मित्रपरिवाराला या घटनेची कल्पना दिली. सदर अधिकाऱ्याचा रहिवासी पत्ता अहिल्यानगर येथील असल्याने त्यांनी तातडीने जवळच्या पोलीस स्टेशनमध्ये धाव घेऊन हा गुन्हा नोंदवला. हा गुन्हा दाखल होताच तो त्याच दिवशी तातडीने घटनास्थळ असलेल्या नेवासा पोलीस स्टेशनकडे वर्ग करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास पूर्णतः तांत्रिक पुराव्यांवर आधारित असून, परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची सखोल तपासणी करून पुढील कारवाई केली जाईल. सध्या नेवासा पोलीस निरीक्षक या गुन्ह्याचा तपास करत असल्याचे वाकचौरे यांनी स्पष्ट केले आहे.**






## दै. आकर्षण निवडक

### सनातन धर्मसभा गायत्री मंदिर अहिल्यानगरच्या वतीने दि.२१ एप्रिल रोजी सामुदायिक (उपनयन) मुंजी

अहिल्यानगर- सनातन धर्मसभा गायत्री मंदिर अहिल्यानगरच्या वतीने दरवर्षी प. पू. शंकराचार्य जयंती निमित्ताने सामुदायिक(उपनयन) मुंजीचा कार्यक्रम आयोजित केला जातो यावर्षी दि.२१ एप्रिल २०२६ रोजी प. पू. शंकराचार्य जयंती असल्याने त्या दिवशी सार्वजनिक (उपनयन) मुंजीचा कार्यक्रम सनातन धर्मसभेच्या वतीने आयोजित केला आहे इच्छुक बटू अथवा त्यांचे पालकांना सामुदायिक मुंजी कार्यक्रमात सहभाग घ्यावयाचा असल्यास संबंधितानी सायंकाळी ५ .३० ते ७. ३० या वेळेत धर्मसभेच्या कार्यालयास संपर्क साधावा किंवा वे. शां. स. पंडित चकोर गुरूजी( ७०८३४५०५७१), वे. शां. स. निलेश धर्माधिकारी गुरूजी (९४२२२२०२३२) व वे. शां. स. उमेश वाळुंजकर गुरूजी( ९९२२०७९१५२) यांच्या बरोबर संपर्क साधावा असे आवाहन अध्यक्ष वेदमुर्ती महेशजी रेखे,उपाध्यक्ष निळकंठ देशमुख, दिनकरराव देशमुख यांनी तसेच सर्व कार्यकारिणी सदस्यांनी केले आहे.

### शहरात ''एज लॉकिंग वॉकिंग स्ट्रीट'' अभियानाचा प्रारंभ




अहिल्यानगर - निरोगी व सुदृढ आरोग्याचा संदेश देत ''एज लॉकिंग वॉकिंग स्ट्रीट'' या अनोख्या उपक्रमाची शहरात सुरुवात करण्यात आली आहे. जीवनशैलीतील सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी आणि नागरिकांना नियमित चालण्याची सवय लागावी या उद्देशाने हा ''निगेंट्रॉपी'' आधारित अभियान पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसदेच्या वतीने राबविण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत पंपिंग स्टेशन ते कराळे जिम या मार्गावर सुमारे ३० मिनिटांचे वॉकिंग करण्यात आले. नागरिकांना दररोज चालण्याचे महत्त्व पटवून देत आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. यावेळी ॲड. कारभारी गवळी, अशोक सब्बन, बीर बहादूर प्रजापती, अशोक भोसले, पोपट भोसले, शाहीर कान्हू सुंबे, ॲड. अमित थोरात, प्रकाश गोसावी, प्रतीक म्हस्के, रमा आढाव, संजय शेकडे, बाजीराव गव्हाणे, लखन साळवे आदींसह नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते। यावेळी बोलताना अशोक सब्बन यांनी सांगितले की, आज माणूस विज्ञान आणि तंत्रज्ञानात प्रगती करत असला तरी आरोग्याच्या बाबतीत मागे पडत आहे. ''आपण जास्त जगतोय, पण चांगलं जगत नाही. वय वाढतंय, पण आरोग्य घटतंय,'' ही वस्तुस्थिती बदलण्यासाठी जीवनशैलीत परिवर्तन आवश्यक आहे. चालण्यातून आरोग्यक्रांतीचा नवा मार्ग सापडू शकतो, असे त्यांनी स्पष्ट केले।''निगेंट्रॉपी'' या संकल्पनेवर आधारित हा उपक्रम शरीर आणि मनातील अव्यवस्था कमी करून सकारात्मक ऊर्जा वाढवण्याचा संदेश देतो. चुकीचा आहार, हालचालींचा अभाव आणि ताणतणाव यामुळे शरीरात ''एंट्रॉपी'' वाढते, ज्यामुळे आजार आणि थकवा वाढतो. यावर उपाय म्हणून संतुलित आहार (फूडिसीन) आणि नियमित श्रम (वॉकिंग-जॉगिंग) यांचा समतोल साधणे गरजेचे असल्याचे मत ॲड. कारभारी गवळी यांनी मांडले।''एज लॉकिंग'' ही संकल्पना वय थांबवण्याबद्दल नसून वृद्धत्वाचा वेग कमी करण्याबाबत आहे. दररोज ३० ते ६० मिनिटे चालल्यास शरीरातील पेशी अधिक कार्यक्षम राहतात, रोगप्रतिकारक शक्ती वाढते आणि मानसिक ताजेपणा टिकून राहतो. पंपिंग स्टेशन ते कराळे जिम हा मार्ग आता ''वॉकिंग स्ट्रीट'' म्हणून ओळखला जाऊ लागला असून तो एक प्रकारचा सार्वजनिक आरोग्य मार्ग ( ) बनत आहे. कोणतेही शुल्क नसलेला, सर्व वयोगटांसाठी खुला असलेला हा उपक्रम आरोग्याला वैयक्तिक नव्हे तर सामाजिक चळवळीचे स्वरूप देत आहे। या अभियानामुळे केवळ शारीरिकच नव्हे, तर मानसिक बदलही घडून येतो. नियमित चालण्यामुळे मेंदूमध्ये सकारात्मक सवयींचे पॅटर्न तयार होऊन दीर्घकालीन जीवनशैलीत परिवर्तन होते. ''मेंदू बदलला की समाज बदलतो,'' हा संदेश या चळवळीच्या माध्यमातून देण्यात येत आहे. वाढते आजार, वाढता आरोग्य खर्च आणि औषधांवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी ही चळवळ महत्त्वाची ठरत असून समाजात सकारात्मक ऊर्जा निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे।

# 'महिला आरक्षणाला विरोध करणाऱ्यांना महिला धडा शिकवतील' – पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील

**वांबोरी गटात भाजप महायुतीची जाहीर सभा; अक्षय कर्डिले यांच्या विजयासाठी कार्यकर्त्यांचा निर्धार**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** राहुरी–पाथर्डी–नगर विधानसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप महायुतीचे उमेदवार अक्षय कर्डिले यांच्या प्रचारार्थ वांबोरी गटातील कार्यकर्त्यांची जाहीर सभा उत्साहात संपन्न झाली. या सभेत कार्यकर्ते, पदाधिकारी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून अक्षय कर्डिले यांना विक्रमी मताधिक्याने विजयी करण्याचा निर्धार व्यक्त केला.

सभेत मार्गदर्शन करताना पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केंद्र सरकारच्या महिला आरक्षण विधेयकाचा उल्लेख करत विरोधकांवर टीका केली. ते म्हणाले की, केंद्रातील भाजप सरकारने महिला आरक्षण विधेयक मंजूर करण्याचा प्रयत्न केला, मात्र काँग्रेस, राष्ट्रवादी (शरद पवार गट) आणि शिवसेना (उद्धव ठाकरे गट) यांच्या खासदारांनी त्याला विरोध केला.

''हा पराभव नरेंद्र मोदी सरकारचा नसून देशातील महिलांचा आहे. त्यामुळे राहुरी पोटनिवडणुकीत महिला या विरोधकांना धडा शिकवतील,'' असा इशारा त्यांनी दिला. ते पुढे म्हणाले की, सरकार म्हणून आम्ही जनतेचे प्रश्न सोडवण्याचे काम करत आहोत. वांबोरी परिसरातील पाण्याचे योग्य नियोजन करून हा भाग दुष्काळमुक्त करण्यासाठी प्रयत्न केले जातील. वांबोरी गटातील जनता नेहमीच आमच्यासोबत राहिली असून याही निवडणुकीत अक्षय कर्डिले यांना सर्वाधिक मते मिळतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. स्वर्गीय आमदार शिवाजीराव कर्डिले यांनी सुरू केलेल्या विकासकामांचा वारसा पुढे नेण्याचे काम अक्षय कर्डिले करतील, असे सांगत त्यांनी सर्वांना त्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहण्याचे आवाहन केले.

या सभेला आमदार काशिनाथ दाते, उमेदवार अक्षय कर्डिले, ज्येष्ठ नेते सुभाष पाटील, प्रशांत गायकवाड, वसंत चेडे, विनायक देशमुख, ॲड. तात्यासाहेब डोळसे, शिवाजी सागर, प्रा. शामराव पठारे, उदयसिंह पाटील, दत्तात्रय गडाख आदींसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार काशिनाथ दाते यांनी आपल्या भाषणात सांगितले की, ''स्वर्गीय शिवाजीराव कर्डिले हे जनतेमध्ये राहून काम करणारे नेतृत्व होते. त्यांनी स्वतःची काळजी न करता जनतेची सेवा केली. नगर तालुक्यावर त्यांची मजबूत पकड होती आणि जनतेशी थेट नाळ जोडली गेली होती.

ते पुढे म्हणाले की, ''मी आमदार होण्यात नगर तालुक्याचा मोठा वाटा असून त्याचे श्रेय स्वर्गीय शिवाजीराव कर्डिले यांना जाते. वांबोरी गावाशी आमचे स्नेह संबंध असून येथील मतदार अक्षय कर्डिले यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करतील. उमेदवार अक्षय कर्डिले यांनी आपल्या भाषणात मतदारांना भावनिक साद घालत सांगितले की, ''माझ्या वडिलांचे अपूर्ण राहिलेले विकासाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी मला मतरूपी आशीर्वाद द्या. मी जनतेच्या विश्वासाला पात्र ठरण्यासाठी प्रामाणिकपणे काम करेन. ज्येष्ठ नेते सुभाष पाटील यांनीही मनोगत व्यक्त करत कार्यकर्त्यांना एकजुटीने काम करण्याचे आवाहन केले. सभेदरम्यान कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह दिसून आला. गावागावातील बूथ प्रमुखांनी प्रचार अधिक तीव्र करण्याचा निर्धार केला.

## वाडिया पार्कवर मनपा क्रीडा स्पर्धांचा जल्लोष; अधिकारी-कर्मचाऱ्यांचा उत्साह शिगेला



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहरातील वाडिया पार्क येथे अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने आयोजित अधिकारी व कर्मचारी क्रीडा स्पर्धांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून संपूर्ण क्रीडांगणावर उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे. विविध क्रीडा प्रकारांमधून कर्मचाऱ्यांनी आपली ऊर्जा, कौशल्य आणि सांघिक भावना प्रभावीपणे सादर केली.

या स्पर्धांमध्ये धावणे, जलद गतीने चालणे, गोळाफेक आणि कॅरम अशा विविध प्रकारांचा समावेश करण्यात आला होता. प्रत्येक स्पर्धेत चुरशीची लढत पाहायला मिळाली. सहभागी खेळाडूंनी जिंकण्याच्या जिद्दीने उत्कृष्ट कामगिरी करत उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे महिला कर्मचाऱ्यांचा मोठ्या प्रमाणावर झालेला सहभाग. त्यांनी उत्साहाने मैदानात उतरून आपले कौशल्य सिद्ध केले. त्यांच्या सहभागामुळे स्पर्धांना अधिक रंगत आली आणि महिला सक्षमीकरणाचे प्रेरणादायी चित्रही उभे राहिले.

महानगरपालिकेच्या या उपक्रमामुळे कर्मचाऱ्यांना धकाधकीच्या दिनचर्येतून थोडा विरंगुळा मिळत असून शारीरिक तंदुरुस्ती आणि मानसिक समाधान साध्य होत आहे. क्रीडा स्पर्धा हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून निरोगी जीवनशैलीकडे नेणारा महत्त्वाचा मार्ग असल्याचे यावेळी अधोरेखित झाले.

मनपा क्रीडा अधिकारी फिलिप्स यांनी सांगितले की, ''नियमित खेळ आणि व्यायामामुळे शरीर निरोगी राहते, तसेच मानसिक ताण कमी होतो. अशा स्पर्धांमुळे कर्मचाऱ्यांमध्ये एकजूट, समन्वय आणि सांघिकतेची भावना अधिक दृढ होते. स्पर्धेदरम्यान प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सहकाऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित राहिले होते. संपूर्ण वातावरणात उत्साह, आनंद आणि सकारात्मक ऊर्जा जाणवत होती.

महापालिकेच्या वतीने सर्व सहभागी खेळाडूंचे कौतुक करण्यात आले.

# डॉक्टर म्हणजे भु–तलाव वरचे चाल ते बोलते देव – तारकेश्वर गडाचे महंतआदिनाथ शास्त्री





(छाया : सतिष जगताप)

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**खरवंडी कासार –** डॉक्टर म्हणजे भु–तलावावरचे चालते बोलते देव आहेत रुग्णांनी आपली व्याधी सांगताच तात्काळ निदान होऊन आराम मिळतो मंदिरातील देव माणसाशी बोलत नाहीत असे मत तारकेश्वर गडाचे महंत आदिनाथ महाराज शास्त्री खरवंडी कासार येथे व्यक्त केले ते साईदिप हॉस्पिटल उद्धाटन प्रसंगी व्यासपिठावरून बोलत होते प्रमुख उपस्थितीत व्यासपिठावर पाथर्डी –शेवगाव विद्यमान आमदार मोनिकाताई राजळे उपस्थित होत्या तर व्यासपिठावर तुळजाभवानी संस्थान महंत संतोष महाराज खताळ प्राथमिक आरोग्यकेंद्र खरवंडी कासार माजी वैद्यकिय अधिकारी डॉ.ए .बी. जायभाये डॉ.गौतम काळे पाथर्डी नगराध्यक्ष अभय आव्हाड वैद्यकिय अधिकारी भगवान दराडे महादेव दराडे पोलिस उपनिरिक्षक राजेंद्र ढाकणे निंबादैत्य संस्थान अध्यक्ष डॉ.सुभाष देशमुख डॉ. दिपक जायभाये होते यावेळी आमदार राजळे म्हणाल्या की योग्य वेळी उपचार मिळाल्यास आपल्या व्याधी कमी होतात खरवंडी सारख्या ग्रामिण भागात तालुका लेव्हल उपचार पध्दती अद्यावत होत आहे आनंदाची बाब आहे रुग्णसंख्या वाढावी म्हणून शुभेच्छा देत नाही तरआपणा कडे आलेले रुग्ण व्याधी मुक्त व्हावेत आपल्या रुग्णसेवेस शुभेच्छा दिल्या तर यावेळी पोलिस उपनिरिक्षक राजेंद्र ढाकणे म्हणाले की प्राथमिक आरोग्य केंद्र खरवंडी कासार येथिल उपचार पद्धती व निदानपद्धतीत खुप मोठा बदल झाला आहे माजी प्राथमिक आरोग्य वैद्यकिय अधिकारी डॉ.एबी .जायभाये तेथिल पदावर होते त्याचे कार्य परिसराने अनुभवले आज रोजी अनुकरन दिसत नाही दोन एकर जागा असताना पंचक्रोशी साठी ग्रामिण रुग्णालय व्हावे आरोग्य केंद्रात सुविधा मिळाव्यात असे मत व्यक केले यावेळी तारकेश्वर गडाचे महंत आदिनाथ महाराज शास्त्री आमदार राजळे यांचा संन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला यावेळी खरवंडी कासार माजी उपसरपंच शरद दहिफळेसर प्रदिप अंदुरे सेवा सोसायटी चेअरमन नारायण खेडकर मिडसांगवी माजी सरपंच दत्तुनाना पठाडे भालगाव माजी सरपंच अंकुश कासुळे भारजवाडी सरपंच माणिक बटुळे वृद्धेश्वर कारखाण्याचे संचालक बाळासाहेब गोल्हार दत्ताशेठ धारकर आजिनाथ जायभाये लहु दराडे विद्युत महावितरण बाळासाहेब किर्तणे महेश बोरुडे माजी सरपंच आर आर ढाकणे किशोर जगताप सर सोमनाथ अंदुरे गुरुजी कैलास दगडे एन टी खेडकर पांडुरंग जगताप महादेव जगताप शौकत शेख शौकत बागवान आदी ग्रामस्थ उपस्थित होते प्रास्तावीक डॉ.निलेश खेडकर तर उपस्थितांचे आभार अक्षय खेडकर यांनी मानले

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची राहुरी बाजारतळावर सभा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** राहुरी विधानसभा मतदारसंघातील राजकीय वातावरण चांगलेच तापू लागले असून, भारतीय जनता पक्ष व मित्रपक्षांचे उमेदवार अक्षय शिवाजीराव कर्डिले यांच्या प्रचाराला बळ देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सोमवारी, दि. २० एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता राहुरी येथील बाजारतळ (जुना सरकारी दवाखाना समोर) येथे भव्य जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे. या सभेला राज्यातील अनेक दिग्गज नेते उपस्थित राहणार असून, मंत्री पंकजाताई मुंडे, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासह आमदार संग्राम जगताप, मोनिकाताई राजळे, विक्रम पाचपुते, विठ्ठल लंघे, अमोल खताळ, काशिनाथ दाते तसेच विविध पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याची माहिती भाजपा जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग यांनी दिली.

राहुरी मतदारसंघाचे माजी आमदार स्वर्गीय शिवाजीराव कर्डिले आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यातील निकटचे संबंध सर्वश्रुत होते. कर्डिले यांच्या निधनाच्या वेळी बिहारमधील प्रचार दौरा अर्धवट सोडून मुख्यमंत्री तत्काळ त्यांच्या निवासस्थानी दाखल झाले होते. या पार्श्वभूमीवरच त्यांच्या सुपुत्र अक्षय कर्डिले यांना उमेदवारी मिळण्यात मुख्यमंत्री फडणवीस यांची भूमिका महत्त्वाची ठरल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे. मतदारसंघाच्या विकासासाठी निळवंडे धरण कालवा तसेच वांबोरी चारी टप्पा–दोन यांसारख्या महत्त्वाच्या प्रकल्पांना निधी उपलब्ध करून देण्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे योगदान असल्याचा दावा स्थानिक पातळीवर केला जात आहे. तसेच प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी त्यांनी घेतलेल्या पुढाकारामुळे विकासाला गती मिळाल्याचेही सांगितले जाते.



दरम्यान, माजी राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे यांना उमेदवारी अर्ज न भरण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांनी महत्त्वाची भूमिका बजावल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. त्यामुळे या सभेत मुख्यमंत्री कर्डिले यांच्या उमेदवारीला अधिक बळ देत मतदारसंघाच्या विकासासाठी काही महत्त्वपूर्ण घोषणा करण्याची शक्यता वर्तवली जात आहे. सभेच्या पार्श्वभूमीवर भाजपा व मित्रपक्षांच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, तयारीला वेग आला आहे. मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित राहण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. मतदार, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सभेला उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग यांनी केले आहे.

## द आयकॉन पब्लिक स्कूलचे दहावीच्या निकालात दमदार यश



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** द आयकॉन पब्लिक स्कूलने शैक्षणिक वर्ष २०२५२६ मधील दहावीच्या सीबीएसई बोर्ड परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत पुन्हा एकदा आपल्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाची परंपरा सिद्ध केली. शाळेने इंग्रजी, हिंदी, गणित, विज्ञान आणि सामाजिक शास्त्र या पाच मुख्य विषयांवर लक्ष केंद्रित करत विद्यार्थ्यांची कामगिरी घडवली.

या यशात अथर्व महेश्वरी याने ९६.६ टक्के गुण मिळवत शाळेत प्रथम क्रमांक पटकावला. त्याच्या पाठोपाठ आर्यन अमित पाल (९५.६ टक्के) आणि आर्या निखिल जामगांवकर (९५.४ टक्के) यांनी उज्ज्वल कामगिरी नोंदवली. एकूण निकाल अत्यंत समाधानकारक ठरला असून ३ विद्यार्थ्यांनी ९५ टक्के पेक्षा जास्त, तर तब्बल २४ विद्यार्थ्यांनी ९० टक्के पेक्षा अधिक गुण मिळवून शाळेची गुणवत्ता अधोरेखित केली आहे.

विशेष उल्लेखनीय म्हणजे लिबा सय्यद आणि अदित्री श्रीवास्तव यांनी इंग्रजी विषयात शंभर टक्के गुण मिळवून अभूतपूर्व यश संपादन केले.

शाळेच्या व्यवस्थापनाने विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल अभिमान व्यक्त करत शिक्षकांचे समर्पित प्रयत्न आणि पालकांचे सातत्यपूर्ण सहकार्य यांचे मनःपूर्वक कौतुक केले. संस्थेच्या पॅट्रन सौ. मंगला मुथा, चेअरमन अशोक मुथा, डायरेक्टर ॲडमिनिस्ट्रेशन कर्नल आर. सी. राणा तसेच ट्रस्टी निर्मल मुथा व अमित मुथा यांनी सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांचे मनः पूर्वक अभिनंदन केले आहे.

# समाजातील शेवटच्या घटकाचा विकास झाला तरच राष्ट्राची प्रगती होईल- सुरेश चव्हाणके

**अनुलोम व पं.दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान (ट्रस्ट)व पं. दीनदयाळ नागरी सहकारी पतसंस्था यांच्या संयुक्त विद्यमाने विविध सरकारी योजना पोचविण्यासाठी स्वतंत्र कक्षाची स्थापना**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शासकीय योजना आम आदमीपर्यंत पोहोचविण्याचे कार्य रा.स्व.संघाच्या अनुलोम या संस्थेमार्फत संपूर्ण महाराष्ट्रात होत आहे.पंडित दीनदयाळ परिवार व पंडित दीनदयाळ पतसंस्थेच्या पुढाकारातून विविध शासकीय योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी स्वतंत्र कक्ष उभारण्यात आला आहे. ही कौतुकास्पद बाब आहे.पंडित दिनदयाळ उपाध्याय यांच्या विचाराने प्रेरित होऊन समाजाच्या शेवटच्या घटकांपर्यंत शासकीय योजना पोहोचविण्याचे कार्य वसंत लोढा यांनी हाती घेतले आहे. समाजातील शेवटच्या घटकाचा विकास झाला तरच राष्ट्राची प्रगती होईल. हा विचार पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी मांडला होता.अहिल्यानगर येथे महाराष्ट्रात प्रथमच शासकीय योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात आला आहे. पंडित दीनदयाळ उपाध्याय यांना अभिप्रेत असलेले कार्य पुढे नेण्याचे काम अहिल्यानगर मध्ये होत आहे.असे प्रतिपादन प्रखर हिंदुत्ववादी वक्ते व सुदर्शन न्यूजचे मुख्य संपादक सुरेश चव्हाणके यांनी केले आहे.



अनुलोम व पं.दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान (ट्रस्ट) व पं. दीनदयाळ नागरी सहकारी पतसंस्था यांच्या संयुक्त विद्यमाने विविध सरकारी योजना गरजू लाभार्थी पर्यंत पोहचविणे करीता स्वतंत्र कक्षाचा शुभारंभ प्रखर हिंदुत्ववादी वक्ते व सुदर्शन न्यूजचे मुख्य संपादक सुरेश चव्हाणके यांच्या हस्ते करण्यात आला.याप्रसंगी रा.स्व. संघाचे पश्चिम महाराष्ट्र प्रांत कुटुंब प्रबोधन प्रमुख नरेश करपे,पंडित दीनदयाळ पतसस्था व दीनदयाळ परिवाराचे संस्थापक वसंत लोढा,पंडित दीनदयाळ नागरी सह.पतसंस्थेचे मानदसचिव विकास पाथरकर,संचालक बाबासाहेब साठे,अनंत होशिंग,किशोर गांधी,पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान ट्रस्ट चे सचिव बाळासाहेब भुजबळ, कार्याध्यक्ष सुरज अग्रवाल,अनुलोमचे उपविभाग प्रमुख दीपक रोहकले,अमोल अवस्थी भाग जनसेवक, अहिल्यानगर अनुलोम मित्र विशाखा वैद्य,सौरभ जाधव, जामगावकर, राजकुमार जोशी,पंकज जागीरदार,डॉ. दामोदर कळमकर,रुद्रेश अंबाडे,उमेश मेरगू,भाजपाचे पदाधिकारी कालिंदी केसकर,सविता कोटा, उज्वला भांगे आदी उपस्थित होते.

**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)
The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### हजारों हापूस आंब्यांनी नवी पेठ येथील श्रीराम मंदिरात आकर्षक सजावट



अहिल्यानगर- अक्षय तृतीया या पवित्र आणि मंगलमय सणानिमित्त नवी पेठ येथील श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्टच्या वतीने श्रीराम मंदिरात हजारो हापूस आंब्यांची भव्य व आकर्षक सजावट करण्यात आली. दरवर्षीप्रमाणे यंदाही मंदिर परिसर सुगंधी आणि रंगीबेरंगी आंब्यांच्या सजावटीने नटला असून, या अनोख्या उपक्रमामुळे भाविकांमध्ये विशेष आकर्षण निर्माण झाले. सकाळपासूनच मंदिरात भक्तांची मोठी गर्दी उसळली होती. हापूस आंब्यांच्या सुवासाने संपूर्ण परिसर दरवळून गेला होता, तर मंदिरातील देखणे व नयनरम्य सजावट पाहण्यासाठी नागरिकांनी मोठ्या उत्साहाने उपस्थिती लावली. सजावटीमुळे मंदिराचे सौंदर्य अधिक खुलून दिसत होते आणि प्रत्येक भाविक या दैवी वातावरणात हरखून जात होता. या प्रसंगी श्रीरामाची महाआरती मोठ्या भक्तिभावाने संपन्न झाली. आरतीदरम्यान ''जय श्रीराम'' आणि ''जय हनुमान जयजयकार''च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. भाविकांनी श्रद्धेने दर्शन घेत प्रार्थना केल्या आणि अक्षय तृतीयेच्या शुभमुहूर्तावर पुण्यसंचय केला. ट्रस्टचे अध्यक्ष प्रितम मुथ्था व उपाध्यक्ष निखील शेटिया सांगितले की, मंडळाच्या वतीने वर्षभर विविध धार्मिक उत्सव व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन केले जाते. श्रीराम जन्मोत्सव, हनुमान जन्मोत्सव, गोकुळ अष्टमी, अन्नकूट महोत्सव, देवदिवाळी ,प्रतिष्ठा द्वादशी यांसारखे उत्सव मोठ्या उत्साहात साजरे केले जातात. तसेच दर शनिवारी रात्री ८ ते १० या वेळेत संगीतमय श्री हनुमान चालीसा पाठ, भजन संध्या कार्यक्रमास तरुणांचा वाढता प्रतिसाद पाहून ट्रस्ट वतीने येत्या शनिवार पासून बैठक व्यवस्था वाढविण्यात येणार आहे . अक्षय तृतीया निमित्त करण्यात आलेली ही आंब्यांची सजावट केवळ धार्मिक श्रद्धेचे प्रतीक नसून, सामाजिक एकोप्याचेही दर्शन घडवणारी ठरली. मंदिर परिसरात स्वच्छता, सुंदर रोषणाई आणि शिस्तबद्ध व्यवस्था यामुळे कार्यक्रम अधिक यशस्वी ठरला. ट्रस्ट चे सेवेकरी नी भाविकांना योग्य मार्गदर्शन करत सुरळीत दर्शन व्यवस्था ठेवली. या आगळ्यावेगळ्या उपक्रमामुळे श्रीराम मंदिर नवीपेठ पुन्हा एकदा श्रद्धा, भक्ती आणि सांस्कृतिक परंपरेचे केंद्रबिंदू ठरले असून सर्व नगरवासीयांनी या उपक्रमाचे मनापासून स्वागत केल.

### कामगारांना पगार व पीएफ न मिळाल्याने शिव राष्ट्र सेनेचे आयुक्तांना निवेदन

अहिल्यानगर - शिव राष्ट्र सेनेचे संस्थापक व राष्ट्रीय अध्यक्ष श्री. संतोष नवसूपे यांच्या नेतृत्वाखाली अहिल्यानगर महानगर पालिका कार्यालयात आयुक्तांना निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनात नमूद करण्यात आले की, महानगरपालिकेत आरोग्य वर्धिनी, सिक्युरिटी, शिपाई तसेच इतर कामगारांना ठेकेदार पद्धतीने कामावर ठेवण्यात आले असून ऑक्टोबर २०२३ पासून आजपर्यंत या कामगारांना पगार व पीएफ मिळालेला नाही. कामगारांनी वारंवार ठेकेदारांकडे विनंती करूनही त्यांना उडवाउडवीची उत्तरे देण्यात येत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. संबंधित कामगार हे सर्वसामान्य व गोरगरीब कुटुंबातील असून, घरगुती जबाबदाऱ्या, मुलांचे शिक्षण तसेच आजारी आई-वडिलांच्या उपचारांसाठी त्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. मात्र ठेकेदार व प्रशासन याकडे दुर्लक्ष करत असल्याचेही निवेदनात सांगण्यात आले. न्यायासाठी कामगारांनी शिव राष्ट्र सेनेकडे धाव घेतली असून, संघटनेने त्यांच्या प्रश्नाला पाठिंबा दिला आहे. यावेळी बोलताना अध्यक्ष श्री. संतोष नवसूपे यांनी सांगितले की, महानगरपालिकेतील ठेकेदार पद्धतीने काम करणाऱ्या कामगारांवर अन्याय होत असून, त्यांच्या हक्काचा पगार व पीएफ रोखून ठेवणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. हे कामगार दिवस-रात्र प्रामाणिकपणे सेवा देत आहेत, तरीही त्यांना त्यांच्या मेहनतीचा मोबदला मिळत नाही, ही अत्यंत दुर्दैवी गोष्ट आहे.

# अवांतर वाचनामुळे वकिलीतील कौशल्ये समृद्ध - मा.न्या. ए. एच. जोशी

## न्यू लॉ कॉलेजमध्ये वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात संपन्न

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** वकिली व्यवसायात यशस्वी होण्यासाठी खटल्यांचा सखोल अभ्यास आणि वरिष्ठ न्यायालयीन दाखल्यांचा योग्य संदर्भ देणे अत्यावश्यक असून, अवांतर वाचनामुळे वकिलांची बौद्धिक क्षमता आणि कौशल्ये अधिक समृद्ध होतात, असे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाचे माजी.न्यायमूर्ती ए. एच. जोशी यांनी केले.

येथील न्यू लॉ कॉलेज आयोजित वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सचिव ॲड. विश्वासराव आठरे होते.

यावेळी व्यासपीठावर सहसचिव मुकेश मुळे, खजिनदार ॲड. दिपलक्ष्मी म्हसे, विश्वस्त जयंत वाघ, कार्यकारिणी सदस्या सौ. अरुणा काळे, सदस्य ॲड. माणिकराव मोरे, प्राचार्य डॉ. एम. एम. तांबे, प्रा. विजयकुमार शिंदे, स्नेहसंमेलन सचिव प्रा. डॉ. बी. डी. पांढरे, श्रीमती हेमा कदम आदी उपस्थित होते.न्या. जोशी पुढे म्हणाले की, ज्या पद्धतीने गुन्हेगार 'रेकी' करतात, त्याचप्रमाणे वकिलांनीही आपल्या खटल्यांचे विविध स्तरांवर बारकाईने विश्लेषण (मेडिटेशन) करणे आवश्यक आहे. समाजाचा न्यायव्यवस्थेवर आणि शिक्षकांवर असलेला विश्वास आदरयुक्त असल्याचे ते म्हणाले.

अध्यक्षीय भाषणात ॲड. विश्वासराव आठरे यांनी न्या. जोशी यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, त्यांनी न्यायालयीन कामकाजासोबतच सर्वसामान्यांमध्ये मिसळून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या आणि गोरगरिबांच्या प्रश्नांना प्राधान्य दिले. त्यांचे कार्य न्यायव्यवस्थेशी संबंधित सर्वांसाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्राचार्य डॉ. एम. एम. तांबे यांनी स्वागत व प्रास्ताविक करत महाविद्यालयाच्या शैक्षणिक, क्रीडा, सांस्कृतिक उपक्रमांसह राष्ट्रीय सेवा योजना, विद्यार्थी कल्याण मंडळ व अभिरूप न्यायालय आदींचा आढावा घेतला.

कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्र गीताने व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते शिवप्रतिमा पूजनाने झाली. प्रमुख पाहुण्यांची ओळख प्रा. पूनम वडडेपल्ली यांनी करून दिली.

राष्ट्रीय सेवा योजना अहवाल व पारितोषिक वितरण प्रा. जी. ए. हिरडे यांनी, क्रीडा अहवाल प्रा. सुनिल जाधव यांनी, तर शैक्षणिक व सांस्कृतिक पारितोषिक वितरण प्रा. डॉ. रामेश्वर दुसुंगे यांनी सादर केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रियंका खुळे-कांडेकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. बी. डी. पांढरे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. यावेळी विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# जिल्हा पोलिस दल आयोजित चित्रकला पोस्टर स्पर्धेत अपूर्वा नांदुरकर हिचा प्रथम क्रमांक



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्या नगर येथील जिल्हा पोलिस दलाच्या वतीने महिला दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या चित्रकला व पोस्टर स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला असून या मध्ये तारकपूर येथील सेंट विवेकानंद विद्यालयातील इयत्ता नववी मधील अपूर्वा सागर नांदूरकर हिचा प्रथम क्रमांक आला आहे.

येथील पोलिस मुख्यालयात जागतिक महिला दिनानिमित्त चित्रकला व पोस्टर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.या स्पर्धत ६७७ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेला प्रचंड प्रतिसाद मिळाला.

पर्यवेक्षक म्हणून अशोक डोळसे, नंदकुमार देशपांडे, अनामिका म्हस्के, राजेंद्र धस, गणेश नागपुरे, दीपिका राजेभोसले यांनी काम पाहिले. त्यांनी स्पर्धेचा निकाल जाहीर केला. चार गटांत ही स्पर्धा घेण्यात आली होती. चार गटांतील प्रत्येकी सहा विजेत्यांना पारितोषिक देण्यात आली.

कार्यक्रमात जिल्हा पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांचे हस्ते अपूर्वा नांदुरकर हिला प्रशस्तीपत्र, शालेय साहित्य, बक्षिसे देऊन गौरवण्यात आले.यावेळी पोलीस उपाधीक्षक डॉ. दिलीप टिपरसे, सुनील पंडित, अशोक डोळसे, मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पोलिस अधीक्षक डॉ.सोमनाथ घार्गे यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. अपूर्वा नांदुरकर हिला आई, वडील, आजी, आजोबा यांचे मार्गदर्शन मिळाले.तिच्या यशामुळे शाळेचे नाव उंचावले अशी प्रतिक्रिया मुख्याध्यापिका गीता तांबे यांनी दिली सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# श्री भगवान परशुराम जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त परशुराम प्रतिष्ठानच्या वतीने श्री परशुराम याग संपन्न

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** श्री भगवान परशुराम जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त परशुराम प्रतिष्ठानच्या वतीने श्री परशुराम यागाचे आयोजन केले होते.

चितळेरोडवरील ऋग्वेद भवनात भव्य श्री परशुराम याग प्रधान आचार्य वे शा सं सिध्देश्वर निसळ यांच्या उपस्थितीत प्रमुख यजमान भगवान देशमुख आणि सौ. माधुरी देशमुख, संजय देशमुख आणि सौ. अंजली देशमुख यांच्या हस्ते झाला.



कौस्तुभ देशमुख आणि सौ प्रियंका देशमुख अभिराम आणि सौ. आश्लेषा देशमुख,वरद आणि सौ पल्लवी जोशी यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. या यागाची सांगता महाप्रसादाने झाली.यावेळी डॉ सतिश फाटके, डॉ सौ अंजली फाटके, हेमंत लोहगावकर,योगेश दाणी आदी मान्यवर उपस्थित होते.

सुंदर रांगोळी कु. सायली कुलकर्णी हिने काढली होती. कार्यक्रम यशस्वितेसाठी प्रतिष्ठानचे श्रीया देशमुख,विजय देशपांडे, अनंत कुलकर्णी, अतूल शुक्ल अनिरुद्ध भहूरकर ,सार्थक भोंग, देवांग कुलकर्णी, ऋतु वैद्य, संकल्प उदास, सायली कुलकर्णी, स्वाती गटणे , कृतार्थ भोंग, अथर्व कुकडे, अथर्व देशपांडे, अबोली कुलकर्णी, दिपाली टाकळकर आदीनी परीश्रम घेतले.

त्याचप्रमाणे उदया अक्षयतृतीयेनिमित्ताने भव्य मिरवणुक काढण्यात येणार आहे मिरवणुक प्रोफेसर कॉलनीतील रेणुका मातामंदिर पासून सुरू होउन भिस्तबाग अहिल्या चौकात महाआरती आणि प्रसादाने समारोप होईल तरी सर्व नगरकरांनी कार्यक्रमासाठी आवश्य येण्याचे करावे.

# विद्यार्थ्यांनी १०० सेकंदात मांडल्या नाविन्यपूर्ण व्यावसायिक कल्पना




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर येथील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजच्या बीबीए विभागातील उद्योजकता विकास कक्ष यांच्या वतीने १०० या आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेचे दिनांक १८ एप्रिल २०२६ रोजी यशस्वी आयोजन करण्यात आले. या स्पर्धेमध्ये विविध महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आपल्या नाविन्यपूर्ण व्यावसायिक कल्पना केवळ १०० सेकंदांमध्ये प्रभावीपणे सादर केल्या.

या कार्यक्रमासाठी परीक्षक म्हणून डॉ. राहुल खंडेलवाल आणि श्री. विकास सचदेव उपस्थित होते. त्यांनी स्पर्धकांचे सादरीकरण, नाविन्यपूर्णता, व्यावसायिक व्यवहार्यता, आत्मविश्वास आणि वेळेचे नियोजन या निकषांवर सखोल व वस्तुनिष्ठ मूल्यमापन केले. तसेच स्पर्धेच्या अनुषंगाने त्यांनी विद्यार्थ्यांना स्टार्टअप्स, नवकल्पना आणि उद्योगक्षेत्रातील संधींबाबत मार्गदर्शन करत मौल्यवान सूचना दिल्या.

या स्पर्धेत एकूण ०७ महाविद्यालयांमधील ३४ विद्यार्थी संघांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. विविध पार्श्वभूमीतील विद्यार्थ्यांनी नाविन्यपूर्ण व व्यावहारिक व्यवसाय कल्पना प्रभावीपणे सादर करत स्पर्धेला रंगत आणली. विजेत्यांना आकर्षक रोख पारितोषिके, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. तसेच सर्व सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले.

या स्पर्धेत बाहेरील महाविद्यालयांमधील सहभागींच्या गटात संजिवनी युनिव्हर्सिटी, अहिल्यानगर येथील वाघ गोकार्ण व राऊत हिमांशू यांनी प्रथम क्रमांक पटकावला, तर पेमराज सारडा कॉलेज, अहिल्यानगर येथील पियुष नव्लानी यांनी द्वितीय क्रमांक मिळवला आणि श्री छत्रपती शिवाजी महाराज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, अहिल्यानगर येथील कलाडा ईशान व आनंदकर सार्थक यांनी तृतीय क्रमांक प्राप्त केला. तसेच , अहिल्यानगर संस्थेतील स्पर्धकांमध्ये अहुजा अमृत व लोहाडे निर्मल () यांनी प्रथम क्रमांक, चांदे मानसी () यांनी द्वितीय क्रमांक आणि शेख झेबा () यांनी तृतीय क्रमांक मिळवून उत्कृष्ट कामगिरी केली. विजेत्यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. या उपक्रमासाठी संचालक डॉ. एम. बी. मेहता, उपसंचालक डॉ. विक्रम बार्नबस यांचे मार्गदर्शन लाभले असून, विभाग समन्वयक डॉ. हर्षवर्धन भावसार तसेच विभाग समन्वयक डॉ. सय्यद मुदस्सर यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

# २१ एप्रिलपासून राज्यातील १७ लाख कर्मचारी-शिक्षक बेमुदत संपावर

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** राज्यातील सरकारी, निमसरकारी कर्मचारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आपल्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी येत्या मंगळवार, दि. २१ एप्रिल पासून बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय घेतला आहे. अहिल्यानगर जिल्हा राज्य सरकारी, निमसरकारी कर्मचारी, मुख्याध्यापक व शिक्षक संघटना समन्वय समितीच्या वतीने जिल्हाभरात तसेच शहरातील शासकीय कार्यालयांमध्ये बैठका घेऊन संपाची तयारी पूर्ण करण्यात आली आहे.

समन्वय समितीचे निमंत्रक रावसाहेब निमसे व कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष सुभाष तळेकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, या संपात राज्यभरातील सुमारे १७ लाख कर्मचारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहभागी होणार आहेत. गेल्या दीड वर्षांपासून शासनाकडून कर्मचारी व शिक्षकांच्या विविध मागण्यांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप संघटनांनी केला आहे. यापूर्वीही लक्षवेधी आंदोलने, निवेदने, निदर्शने अशा सातपेक्षा अधिक आंदोलनांद्वारे शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, त्यावर ठोस निर्णय न झाल्यामुळे कर्मचारी वर्गात नाराजी आणि संताप वाढला आहे.

संघटनांच्या मते, पूर्वीच्या शासनकाळात दिलेली आश्वासने अद्याप पूर्ण करण्यात आलेली नाहीत. आर्थिक व सेवाविषयक प्रश्नांवर चालढकल केली जात असल्याने कर्मचारी वर्गामध्ये असंतोष निर्माण झाला आहे. सन २०२४ मध्ये जाहीर करण्यात आलेल्या सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन संदर्भातील अधिसूचना अद्याप लागू न झाल्याने, १ मार्च २०२४ नंतर निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना तात्पुरते निवृत्तीवेतनही मिळालेले नाही, ही बाब गंभीर असल्याचे संघटनांनी नमूद केले आहे.

तसेच, सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत १०:२०:३० वर्षांनंतरचे लाभ हजारो कर्मचारी व शिक्षकांना मिळालेले नाहीत. राज्यातील सुमारे ३५ टक्के पदे रिक्त असल्याने कार्यरत कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा ताण पडत आहे आणि पदोन्नती प्रक्रियेत अडथळे निर्माण होत आहेत. या संपात जुनी पेन्शन योजना लागू करणे, निवृत्तीचे वय ६० वर्षे करणे, रिक्त पदे तात्काळ भरणे, कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायम करणे, चतुर्थश्रेणी व वाहनचालक भरतीवरील बंदी उठवणे, सर्व कर्मचाऱ्यांसाठी कॅशलेस आरोग्य विमा योजना लागू करणे हे प्रामुख्याने मागण्या आहेत. संघटनांनी सांगितले की, केरळसारख्या राज्यात ५ लाख रुपयांपर्यंत कॅशलेस आरोग्य विमा योजना उपलब्ध आहे, त्याच धर्तीवर महाराष्ट्रातही योजना लागू करावी. या बेमुदत संपामुळे शासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालये आणि विविध विभागांतील कामकाजावर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. नागरिकांना अनेक सेवांमध्ये अडचणींचा सामना करावा लागू शकतो. समन्वय समितीचे राज्य निमंत्रक विश्वास काटकर यांनी राज्यातील सर्व कर्मचारी-शिक्षकांना एकत्र येऊन या संपात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. ''प्रलंबित १८ मागण्यांसाठी हा निर्णायक लढा असून, शासनाने तात्काळ निर्णय न घेतल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल,'' असा इशाराही देण्यात आला आहे.

# भारतीय बौद्ध महासभेच्या स्पर्धांचा पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भारतीय बौद्ध महासभा अहिल्यानगर शहर शाखा, जिल्हा शाखा व महिला शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त आयोजित विविध शालेय स्पर्धांचा पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात पार पडला. चित्रकला, वकृत्व आणि रांगोळी स्पर्धांचे आयोजन दि. ११, १२ व १३ एप्रिल रोजी सिद्धार्थनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन येथे करण्यात आले होते.

चित्रकला स्पर्धेत एकूण ४८ स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. पहिली ते चौथी गटात प्रथम राजरत्न सनी महागडे, द्वितीय अर्णवी अमोल शेलार, तृतीय खुशी दिनेश चव्हाण यांनी क्रमांक पटकावले. पाचवी ते दहावी गटात प्रथम मयूर रवी वाकोडे, द्वितीय अनुग्रह मनोज घोरपडे, तृतीय यश सचिन क्षेत्रे हे विजेते ठरले.

वकृत्व स्पर्धेत २८ स्पर्धकांनी सहभाग घेतला. पहिली ते सहावी गटात प्रथम प्रेरणा गितेश गायकवाड, द्वितीय आदिती विनोद गायकवाड, तृतीय प्रेम अजय गायकवाड,



तर उत्तेजनार्थ सत्यम प्रमोद पडागळे यांचा समावेश होता. सातवी ते बारावी गटात प्रथम ज्ञानेश्वरी सुनिल खेडकर, द्वितीय प्रांजल भगवान थोरात, तृतीय वैष्णवी किरण लाड, तसेच उत्तेजनार्थ प्रतीक्षा दिपक केदारी यांनी यश संपादन केले.

रांगोळी स्पर्धेत २७ स्पर्धकांनी सहभाग घेतला. प्रथम अनुष्का चौधरी, द्वितीय अंशूकुमारी पंडित, तृतीय चैत्राली बारटक्के यांना पारितोषिके मिळाली. उत्तेजनार्थ हर्षदा काजळकर व प्रेरणा चक्रनारायण यांचा गौरव करण्यात आला. सर्व विजेत्यांना अनुक्रमे रोख रुपये ३००, २०० व १०० तसेच संस्थेचे प्रमाणपत्र देण्यात आले.

या स्पर्धांचे पारितोषिक वितरण जिल्हाध्यक्ष राजेंद्र साळवे, रविंद्र कांबळे, शहराध्यक्ष दिपक पाटोळे, सरचिटणीस लक्ष्मण माघाडे, हर्षाताई पंचमुख, रेखाताई भिंगारदिवे, रत्नमाला पाटोळे, मोहनजी शिरसाट, राजेंद्र पाडळे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी शहर शाखेचे अध्यक्ष दिपक पाटोळे, सरचिटणीस लक्ष्मण माघाडे, कोषाध्यक्ष विजय चाबुकस्वार, उपाध्यक्ष मोहन शिरसाट, हिशोब तपासणी प्रमुख राजेंद्र पाडळे, संस्कार उपाध्यक्ष युवराज बनसोड, सचिव शशिकांत घोडके, संघटक राजेंद्र थोरात, संतोष जाधव, संजय डहाणे, अविनाश राक्षे आदींनी परिश्रम घेतले.

तसेच जिल्हा शाखेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र साळवे, सचिव रविंद्र कांबळे, भगवंतराव गायकवाड, राहुल कांबळे, महिला शाखेच्या जिल्हाध्यक्षा सुनीताताई गायकवाड, उपाध्यक्षा हर्षाताई पंचमुख, शहराध्यक्षा रेखाताई भिंगारदिवे, दीपा चव्हाण, विद्या शिंदे, शोभा घोडके यांनीही सहकार्य केले. स्पर्धांचे परीक्षक म्हणून माजी प्राचार्य विलास साठे, प्राचार्य महावीर सोनटक्के, वस्तीगृह अधीक्षिका ज्योती गायकवाड, निवृत्त शिक्षिका रत्नमाला पाटोळे, तसेच शेखर उंडे यांनी काम पाहिले.

# साईचरण पादुकांचे आगमन; एमआयडीसी नवनागापुरात दिवसभर दर्शनासाठी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** अहिल्यानगर शहर व जिल्ह्यातील साईभक्तांसाठी एक ऐतिहासिक व पवित्र क्षण अनुभवण्याची सुवर्णसंधी लाभणार आहे. श्री.क्षेत्र शिर्डी येथून सच्चिदानंद सद्गुरू श्री साईनाथ महाराजांच्या मूळ चरणपादुका सोमवार, दि. २० एप्रिल २०२६ रोजी सकाळी ८ वाजता एमआयडीसी () नवनागापूर येथील श्री साईबाबा मंदिरात आगमन होणार आहे.

या पवित्र सोहळ्यास जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील, साईबाबा संस्थान शिर्डीचे अध्यक्ष तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे प्रमुख सत्र न्यायाधीश शिवाजी भगवानराव कचरे, साई संस्थानचे कार्यकारी अधिकारी गोरख गाडीलकर यांचे विशेष सहकार्य लाभले आहे. तसेच जयहिंद माजी सैनिक संस्थेचे अध्यक्ष मेजर निळकंठ उल्हारे, श्री साईबाबा मंदिर सार्वजनिक ट्रस्टचे अध्यक्ष आकाश कोल्हाळ व वन अधिकारी बाळासाहेब सुंबे यांच्या अथक प्रयत्नांतून हा सोहळा साकारला आहे.

पादुकांचे आगमन झाल्यानंतर विठ्ठल-रुक्मिणी मंदिर, चेतना कॉलनी () येथून ढोल-ताशांच्या गजरात भव्य मिरवणूक काढण्यात येणार असून, ती नवनागापूर येथील साईबाबा मंदिरात येऊन विसावणार आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात प्रथमच साईबाबांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या मूळ चरणपादुकांचे आगमन होत असल्याने शहरासह श्री क्षेत्र मांजरसुंबा, डोंगरगण, पिंपळगाव माळवी, वडगाव गुप्ता, शेंडी, पोखर्डी, पिंपळगाव उजनी, सावेडी, तपोवन रोड, पाईपलाईन रोड, नागापूर, नवनागापूर, , बोल्हेगाव, इसळक, निबळक, खारेकर्जुने व विळद परिसरातील साईभक्तांना दर्शनाचा अलौकिक लाभ घेता येणार आहे. सकाळी ८ ते १० या वेळेत मिरवणूक पार पडेल, तर सकाळी १० ते रात्री १० वाजेपर्यंत साईबाबा मंदिर, नवनागापूर येथे सर्व भक्तांसाठी दर्शन खुले राहणार आहे. दुपारी ३ ते ६ या वेळेत ह.भ.प. विक्रम महाराज अवचिते यांचे साई भजन व कथा, तर सायंकाळी ७ ते ९ या वेळेत ह.भ.प. बाळकृष्ण महाराज ताहाराबादकर यांचे कीर्तन होणार आहे.

दिवसभर दर्शनानंतर सर्व साईभक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

या पवित्र कार्यक्रमासाठी आमदार संग्राम जगताप, उपमहापौर धनंजय जाधव, नगरसेवक कुमार वाकळे, मनोज कोतकर, सुनील त्र्यंबके, निखिल वारे, नवनाथ कातोरे व आकाश कातोरे यांचे विशेष सहकार्य लाभले आहे. या सोहळ्यास स्वेच्छेने योगदान व सेवेसाठी इच्छुकांनी मेजर निळकंठ उल्हारे (मो. ८२४०९७२२३१) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन श्री साईबाबा मंदिर सार्वजनिक ट्रस्ट, नवनागापूरचे अध्यक्ष आकाश कोल्हाळ व सर्व विश्वस्त, तसेच जयहिंद माजी सैनिक बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष मेजर निळकंठ उल्हारे यांनी केले आहे.

# मतदार यादी विशेष पुनरावलोकन मोहिमेच्या माध्यमातून विरोधी मतदारांची नावे गायब करण्याचे षड्यंत्र – किरण काळे

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** सध्या महाराष्ट्रासह देशातील २२ राज्यांमध्ये मतदार यादी विशेष पुनरावलोकन मोहिम (एसआयआर) राबवली जात आहे. विरोधी मतदारांची नावे गायब करण्यासाठीचं हे सत्ताधाऱ्यांचं देश विरोधी षडयंत्र आहे. एसआयआर ही वोट चोरीची योजना आहे. निवडणूक आयोग आता वोट चोरी षडयंत्राचा सक्रिय भागीदार बनला असून हा लोकशाही वरील हल्ला असल्याचा गंभीर आरोप, ठाकरे शिवसेनेचे महानगर प्रमुख किरण काळे यांनी केला आहे. आपली नावे गायब होणार नाहीत या साठी मॅपिंग करून घेत मतदारांनी जागरूक रहावे, असे आवाहन काळे यांनी केले आहे.

अहिल्यानगर शहरातील मतदारांची मतदार यादीतील नावे सुरक्षित व अबाधित राहण्यासाठी जनजागृती अभियान विरोधकांच्या वतीने सुरू करण्यात आले आहे. त्याच्या शुभारंभ प्रसंगी काळे बोलत होते. यावेळी संजय झिंजे, मनोज गुंदेचा, विलास उबाळे, अनिस चुडीवाला, अनंत गारदे, रावजी नांगरे, पै. दीपक भोसले, सुशांत म्हस्के, प्रतीक बारसे, राम वाणी, राम झिने, प्रा. अमोल खाडे, रोहन शेलार, मतीन शेख, विकेश गुंदेचा, गणेश आपरे, शंकर आव्हाड, नलिनी गायकवाड, नीता बर्वे, अर्चना गायकवाड, शारदा वाघमारे, उषा भगत, शैला लांडे, रजनी ताठे, मीना रणशूर, रूपाली आपरे, लोकेश बर्वे, विजय शिरसाठ, चंद्रकांत उजागरे, जयराम आखाडे, विनोद शिरसाट, राम धोत्रे, सोनू देशमुख, आकाश अल्हाट, विकास भिंगारदिवे, निलेश लांडे, आप्पासाहेब लांडगे आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

किरण काळे म्हणाले, एसआयआर प्रक्रिया घाईघाईने आणि नियोजित रीतीने राबवली जात आहे, ज्यामुळे खऱ्या मतदारांचे, विशेषतः गरीब, दलित, ओबीसी, अल्पसंख्याक आणि स्थलांतरित नावे यादीतून काढली जात आहेत. जी मतं सत्ताधाऱ्यांच्या विरोधात पडतात ती हेरून वगळली जात आहेत. ही मत चोरीला झाकण्यासाठी योजना आहे. निवडणूक आयोग दबावाखाली काम करत आहे. ही मोहीम म्हणजे मतदार यादी स्वच्छ करण्याचे नाव आहे, पण प्रत्यक्षात खऱ्या मतदारांना वंचित ठेवण्याचे षडयंत्र आहे. आपली नावे मतदार यादीत अबाधित राहण्यासाठी नागरिकांनी जागरूक राहावे. मॅपिंग करून घ्यावे. आपल्या केंद्राच्या बीएलओशी संपर्क साधावा. या प्रक्रियेत काही अडचणी आल्यास मतदारांनी आमच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन काळे यांनी केले आहे.

**देश तोडण्याचे षडयंत्र फसले :** अनेकांच्या बलिदानानंतर स्वातंत्र्य मिळाल. त्यानंतर संघराज्य पद्धतीने लोकशाही आधारित संसदीय प्रणाली देशाने स्वीकारली. मात्र महिला आरक्षणाचा बागुलबुवा उभा करून लोकसभा मतदारसंघाच्या पुनर्रचनेच षडयंत्र आखलं होतं. मात्र देश तोडण्याचे हे षडयंत्र विरोधी पक्षांनी मोडून काढलं. महिला अत्याचाराच हथराव, उन्नाव प्रकरण, मणिपूर मध्ये महिलांची नग्न धिंड, महिला खेळाडूंवर अत्याचार होत असताना नारी शक्तीचा ढोंगी दिंडोरा वाजवणारे मूग गिळून गप्प का होते ? घरगुती गॅस तूटवड्या मुळे आजही अनेक माता भगिनी मोठ्या त्रासाचा सामना करत आहेत. लाडक्या बहीण योजनेची मदत वारंवार वेळेत मिळत नाही.

# अहिल्यानगर आता आधुनिक वैद्यकीय सेवेकडे वेगाने वाटचाल करत आहे - डॉ. सुजय विखे पाटील

**ही केवळ हॉस्पिटलची नव्हे, तर शहराच्या प्रगतीची सुरुवात ; आमदार संग्राम जगताप**



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर शहरातील साताळकर लोटस रुग्णालयात अत्याधुनिक रोबोटिक शस्त्रक्रिया प्रणाली सुरू होत शहराच्या आरोग्य क्षेत्रात नवा ठसा उमटवला आहे. रोबोटच्या सहाय्याने शस्त्रक्रिया करणारी सुविधा उपलब्ध करून देणारे हे शहरातील पहिलेच रुग्णालय ठरले असून, त्यामुळे जिल्ह्यातील रुग्णांना आता उच्च दर्जाची वैद्यकीय सेवा स्थानिक पातळीवरच मिळणार आहे.

अक्षय तृतीयाच्या शुभ मुहुर्तावर पार पडलेल्या या भव्य उद्घाटन सोहळ्यास भाजप प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील, नगर शहराचे आमदार संग्राम भैय्या जगताप, हरिभक्त परायण आदिनाथ महाराज शास्त्री, ज्येष्ठ वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. सातारकर, तसेच रुग्णालयातील सर्व डॉक्टर, वैद्यकीय कर्मचारी आणि विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उद्घाटनप्रसंगी बोलताना डॉ. सुजय विखे पाटील यांनी सांगितले की, अहिल्यानगरसारख्या शहरात रोबोटिक शस्त्रक्रिया प्रणाली सुरू होणे ही अत्यंत अभिमानाची बाब आहे. यामुळे रुग्णांना मोठ्या शहरांमध्ये जाऊन उपचार घेण्याची गरज कमी होणार असून, वेळ, पैसा आणि श्रम यांची बचत होणार आहे. साताळकर लोटस रुग्णालयाने आधुनिक वैद्यकीय सेवेत नवा मापदंड निर्माण केला असून, ही सुविधा भविष्यातील आरोग्यसेवेचा एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

यावेळी आमदार संग्राम जगताप यांनी आपल्या भाषणात नमूद केले की, ही सुविधा केवळ एका रुग्णालयापुरती मर्यादित नसून, संपूर्ण शहराच्या प्रगतीचे प्रतीक आहे. अशा अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे नागरिकांना दर्जेदार आणि सुरक्षित उपचार सेवा आपल्या शहरातच उपलब्ध होत आहे, ही निश्चितच अभिमानाची बाब आहे. कार्यक्रमात डॉ. तनवर यांनी रोबोटिक शस्त्रक्रियेबाबत सविस्तर माहिती देताना सांगितले की, रोबोट हा डॉक्टरचा पर्याय नसून एक अत्याधुनिक सहाय्यक आहे. डॉक्टरच्या नियंत्रणाखाली तो अधिक अचूक, स्थिर आणि सूक्ष्म हालचाली करतो, ज्यामुळे शस्त्रक्रिया अधिक सुरक्षित आणि प्रभावी होते. यामुळे रुग्णांना कमी वेदना होतात, रक्तस्राव कमी होतो आणि रुग्ण लवकर बरे होतात, असेही त्यांनी स्पष्ट केले. या प्रसंगी डॉ. सतीश सोनवणे यांना विशेष सन्मानाने गौरविण्यात आले. तसेच महिला बालकल्याण समितीच्या उपसभापती सानप मॅडम, नगरसेवक निखिल वारे, महेश लोंढे, विविध मान्यवर, डॉक्टर, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अक्षय तृतीयानिमित्त श्री विशाल गणेशाला ११११११ आंब्यांचा नैवेद्य



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिरात अक्षय तृतीयानिमित्त श्री विशाल गणेशाला ११११११ आंब्यांचा नैवेद्य दाखवून आंब्यांची सजावट करण्यात आली होती. सकाळी अभिषेक करण्यात आला. दुपारी उद्योजक नरेंद्र फिरोदिया, छाया फिरोदिया,आशा फिरोदिया अनुष्का फिरोदिया ,गौरव भंडारी ,काव्या फिरोदिया यांच्या हस्ते महापुजा करुन आरती करण्यात आली.

याप्रसंगी पुजारी संगमनाथ महाराज याप्रसंगी देवस्थानचे उपाध्यक्ष पंडितराव खरपुडे, सचिव अशोकराव कानडे, ज्ञानेश्वर रासकर ,विजय कोथिंबिरे ,प्रा माणिकराव विधाते ,नितीन पुंड गणेश राऊत आदी उपस्थित होते.

याप्रसंगी पंडितराव खरपुडे म्हणाले, 'अक्षय तृतीया साडेतीन मुहूर्तांपैकी एक आहे. याच दिवशी त्रेता युगाचा प्रारंभ झाला. या दिवशी सत्ययुगाचा प्रारंभ झाली. अशी संधी साधलेली असल्यामुळे अक्षय तृतीया या संपूर्ण दिवसाला 'मुहूर्त' म्हणतात. या दिवसाला साडेतीन मुहूर्तांतील एक मुहूर्त मानले जाते. अक्षय्य तृतीयेच्या दिवशी सात त्याने सुख-समृद्धी प्राप्त करून देणार्या देवतेची कृतज्ञतेचा भाव ठेवून उपासना केल्यास देवतेच्या कृपादृष्टी कायम आपल्यावर राहते. या काळात केलेले दानही सर्वात पवित्र मानले जाते. असेच अक्षयतृतीयानिमित्त आंबा स्वरुपात भाविकांनी दान दिले असल्याचे सांगून भाविकांना दर्शन सुलभ व्हावे, यासाठी सोयी-सुविधा उपलब्ध करुन दिल्या असल्याचे सांगितले.

यावेळी प्रा माणिकराव विधाते यांनी देवस्थानच्या विविध उपक्रमांची माहिती दिली.दानशूर भाविकांचे आभार मानले.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन अशोकराव कानडे यांनी केले तर आभार ज्ञानेश्वर रासकर यांनी मानले यावेळी विजय कोथिंबिरे म्हणाले कि यासाठी फिरोदिया परिवार आणि गणेश भक्त यांचे सहकार्य लाभले .भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती.

# पैठण एमआयडीसीत भीषण अपघात; भरधाव हायव्याच्या धडकेत स्कुटीस्वार ठार





दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पैठण–** शहरातील एमआयडीसी परिसरात रविवारी उशिरा रात्री घडलेल्या भीषण अपघातात एका स्कुटीस्वाराचा जागीच मृत्यू झाला, त्यामुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

प्राप्त माहितीनुसार, एमआयडीसीतील रामा हॉटेलसमोर असलेल्या अग्निशामक कार्यालयाजवळ भरधाव वेगात आलेल्या हायवा वाहनाने स्कुटीला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की, स्कुटीस्वार शिवाजी पठाडे यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. दरम्यान, पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून पंचनामा करत मृतदेह ताब्यात घेतला असून, अपघाताबाबत पुढील तपास सुरू आहे. या घटनेमुळे एमआयडीसी परिसरात शोककळा पसरली असून, भरधाव वाहनांवर नियंत्रण ठेवण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

# शिर्डीत २८ व्या राष्ट्रसंत गाडगेबाबा मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन

**विविध राष्ट्रीय पुरस्कारांचेही होणार वितरण**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**शिर्डी –** राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या १५० व्या जयंती निमित्ताने, डेबूजी फाउंडेशन महाराष्ट्र राज्य आणि कवी सरकार स्वाभिमानी वाचनालय, इंगळी (कोल्हापूर) यांच्या संयुक्त विद्यमाने २८ व्या राष्ट्रसंत गाडगेबाबा मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. हे संमेलन रविवार, २६ एप्रिल २०२६ रोजी शिर्डी येथील हॉटेल जे.के. पॅलेस येथे सकाळी ९ ते सायंकाळी ६ या वेळेत संपन्न होणार आहे.

**दिग्गजांची उपस्थिती आणि उद्घाटन:**

या संमेलनाचे अध्यक्षपद श्री. राजेंद्र सुंदरदास फंड (राहता) भूषविणार असून, स्वागताध्यक्ष म्हणून आचार्य सी.ए. डॉ. शंकर घनश्यामदास अंदानी (पुणे) उपस्थित राहणार आहेत. संमेलनाचे उद्घाटन प्रसिद्ध कादंबरीकार मा. डॉ. श्रीकांत श्रीपती पाटील घुणकी यांच्या हस्ते होणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून शिवसेना शहर उपसंघटक मा. सौ. सुमन गजानन देसाई (मुंबई) उपस्थित राहतील. डॉ शिवाजी शिंदे सोलापूर मा सुनिल गोसावी

**दिवसभराचे भरगच्च कार्यक्रम:**

संमेलनाची सुरुवात सकाळी ९ वाजता राष्ट्रसंत गाडगे महाराज कवी कट्टा ने होईल. त्यानंतर दुसऱ्या सत्रात उद्घाटन सोहळा, प्रतिमा पूजन आणि पुस्तक प्रकाशन पार पडणार आहे. दुपारी जीवनदीप गाडगेबाबांचा या कवी राजेंद्र फंड यांच्या कवितासंग्रहाचे प्रकाशन आणि माय स्टँप तिकीट अनावरण सोहळा संपन्न होईल. दुपारच्या सत्रात मा. बाळासाहेब देशमुख यांचे कथाकथन आणि त्यानंतर निमंत्रितांचे भव्य कवी संमेलन आयोजित करण्यात आले आहे. या कवी संमेलनाचे अध्यक्षपद आचार्य डॉ. शंकर अंदानी भूषवतील, ज्यात राज्यभरातील नामवंत कवी आपला काव्यप्रवास उलगडणार आहेत.

**पुरस्कार वितरण सोहळा:**

साहित्यासोबतच समाजसेवेचा गौरव करण्यासाठी यावर्षी विविध राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार आहे. यात:

**राष्ट्रीय डेबूजी (राष्ट्रसंत गाडगे महाराज) पुरस्कार** राष्ट्रसंत गाडगेबाबा साहित्य, समाजभूषण आणि शिक्षणरत्न पुरस्कार

**राज्यस्तरीय काव्यगौरव पुरस्कार** हे पुरस्कार मा. सौ. माया नवथर (छत्रपती संभाजीनगर) आणि मा एकनाथराव ढाकणे तसेच इतर मान्यवरांच्या हस्ते प्रदान केले जातील.

**पुस्तकांचे प्रकाशन:** या सोहळ्यात सौ. अनुराधा आहेर, सौ. सुरेखा वाडकर, कोमल पाटील, जयश्री काळे, कवी सरकार इंगळी आणि संतोष खंडारे यांच्या विविध साहित्यकृतींचे प्रकाशन प्रा. किसनराव कुऱ्हाडे यांच्या हस्ते होणार आहे. या ऐतिहासिक सोहळ्यासाठी मोठ्या संख्येने साहित्यिक, रसिक आणि समाजप्रेमींनी उपस्थित राहावे, असे आवाहन डेबूजी फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष श्री. राजेंद्र फंड, श्री. कवी सरकार इंगळी, श्री. सुनील निकम आणि आयोजक समितीने केले आहे.

# फ्रेंड्स कॉर्पोरेट क्रिकेट लीगमध्ये रंगले रोमांचक सामने

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** फ्रेंड्स कॉर्पोरेट क्रिकेट लीगमध्ये शनिवारी झालेल्या सामन्यांत खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत प्रेक्षकांचे भरभरून मनोरंजन केले. दोन्ही सामन्यांमध्ये चुरशीची लढत पाहायला मिळाली.

पहिल्या सामन्यात ए बी ऍक्ट अहिल्यानगर संघाने क्रिकेट स्टार करंजी संघावर ५२ धावांनी दणदणीत विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करताना ए बी ऍक्ट अहिल्यानगर संघाने निर्धारित षटकांत ५ बाद १५७ धावांचा मजबूत डोंगर उभारला. या आव्हानात्मक लक्ष्याचा पाठलाग करताना करंजी संघाची फलंदाजी डळमळीत ठरली आणि त्यांना सर्वबाद १०५ धावांपर्यंतच मजल मारता आली. या सामन्यात सर्वांगीण उत्कृष्ट खेळ करत मयूर कोल्हे याने सामनावीराचा किताब पटकावला.

दुसऱ्या सामन्यात शिवराज ऍडव्होकेट संघाने नगर सुपर किंगवर सहज विजय मिळवला. नगर सुपर किंग संघाने प्रथम फलंदाजी करताना ८७ धावांवर सर्वबाद होत मध्यम धावसंख्या उभी केली. प्रत्युत्तरात शिवराज ऍडव्होकेट संघाने हे लक्ष्य केवळ ३ गडी गमावत १०.१ षटकांत पूर्ण करत एकतर्फी विजय नोंदवला. या सामन्यात प्रभावी खेळासाठी ॲड. भारत रासकर याला सामनावीर म्हणून गौरविण्यात आले.

स्पर्धेतील पुढील सामने अधिक रंगतदार होण्याची चिन्हे असून खेळाडूंच्या कामगिरीकडे क्रिकेटप्रेमींचे लक्ष लागून राहिले आहे.

(पान १ वरून)

## मृत्यूपासून वाचण्यासाठी अरुणकाकांप्रमाणे दुसऱ्यांच्या विचारात जिवंत रहा - डॉ. कुमार विश्वास

वारसा आहे व तो आमचा परिवार पुढे नेत असल्याचा अभिमान आहे, असे स्पष्ट करून आमदार जगताप म्हणाले, ही पुण्यश्लोक अहिल्यादेवींची भूमी आहे. या निमित्ताने चांगली व धार्मिक विचारधारा देण्याचा हा उपक्रम आहे. वडिलांच्या स्मृतीनिमित्त व समाजाप्रती आपण काही देणे लागतो या भावनेतून राम कथेचे आयोजन केल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले.आमचा परिवार चुकीच्या गोष्टींना समर्थन देत नाही. अनेक जण अनेक काही करीत असतात पण तो विषय आमच्यापर्यंत आल्यावर तो समाज हिताचा नसेल तर आम्ही तो होऊ देत नाही, असेही त्यांनी सांगितले. या उपक्रमाच्या आयोजनासाठी कुटुंबातील सर्व सदस्य पाठीशी असल्याचा आनंद आहे. धर्मासमवेत चालण्याचा वडिलांचा विचार प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न या निमित्ताने करीत आहोत असेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी डॉ.कुमार विश्वास यांनी विवेचनातून रामकथेतील अनेक जीवन दाखले दिले. त्यांनी प्रभू श्रीरामांच्या जीवनातील विविध पैलू अत्यंत समर्पक, आधुनिक संदर्भासह व तत्वज्ञानात्मक दृष्टिकोनातून उलगडले. 'अपने अपने राम' या संकल्पनेद्वारे प्रत्येकाच्या जीवनात रामाचे वेगवेगळे अर्थ कसे प्रकट होतात, याचे त्यांनी सखोल विश्लेषण केले. त्यांच्या कथनातून राम म्हणजे केवळ धार्मिक श्रद्धेचा विषय नसून आदर्श आचरण, कर्तव्यनिष्ठा, संयम, त्याग व मूल्याधिष्ठित जीवनपद्धतीचे प्रतीक असल्याचा संदेश प्रभावीपणे मांडण्यात आला.

कथे दरम्यान डॉ. विश्वास यांच्या भजनांना उपस्थित श्रोत्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. काव्य, विनोद, तत्त्वज्ञान व जीवनमूल्यांचा सुंदर संगम असलेल्या या रामकथेमुळे संपूर्ण वातावरण राममय, भक्तिमय व प्रेरणादायी झाले. माता जगदंबेचा अंश असलेल्या अहिल्यादेवींनी व छत्रपती शिवाजी महाराज यांनी प्रभू श्रीरामांचे राम राज्य प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न केला. मानवी शरीर धर्मनिरपेक्ष नाही. झोपेतून उठल्यापासून सायंकाळी पुन्हा झोपेपर्यंत प्रत्येकाचे शरीर विविध शरीर धर्म पाळते. त्यामुळे राजसत्ता ही धर्मनिरपेक्ष असू शकत नाही. ती जेव्हा धर्मासमवेत चालते तेव्हा अहिल्यादेवींचे व छत्रपती शिवरायांचे शासन अनुभवास येते असे स्पष्ट करून विश्वास म्हणाले, राम कथा प्रत्येकाच्या जीवनाशी निगडित आहे राक्षसांना मारण्यासाठी विश्वमित्रांनी राजा दशरसाकडे त्याच्या चारही पत्रांची मागणी केली. त्यावेळी माझेच पुत्र का? असा सवाल दशरथाने केल्यावर विश्वामित्र म्हणाले, तुझ्या चारही पत्रांकडे तारुण्य, धन, प्रभुत्व व संपत्ती आहे. परंतु त्यापेक्षा जास्त महत्त्वाचे म्हणजे मर्यादा, संकल्प, प्रतिभा व विनम्रता आहे. या पार्श्वभूमीवर आजची तरुण पिढी धिस इज माय लाईफ! असा घोष करते. तेव्हा ती मनोरुग्ण होत असल्याचे जाणवते. प्रत्येकाला आई वडील व समाज मोठा करतो. त्यामुळे प्रत्येकाचे जीवन हे देशाचे जीवन असते. हा विचार तरुणाई मध्ये रुजण्यासाठी राम कथा तरुणपणीच ऐकली पाहिजे.

पित्याने वनवास दिला तरी पित्याने मला जंगलाचे राज्य दिले असा विचार प्रभू रामाने केला. लंका विजयानंतर बिभीषणाचा अभिषेक लक्ष्मणाला करायला लावला. कारण वनवास काळात कोणत्याही नगरात जाणार नाही, असा शब्द रामाने वडिलांना दिला होता. यातून मर्यादा, वचनबद्धता व शौर्याचे दर्शन रामजीवनातून होते. गव्हातील किडा काढून टाकता येतो परंतु पाल्याचे चारित्र्य बिघडले तर दुरुस्त करणे कठीण जाते. यामुळे जीवन धर्म समजण्यासाठी युवा पिढीला राम शिकवला पाहिजे. राम हा मनुष्य आहे. तो अतिमानवीय नाही. त्याने कोणतीही चमत्कार केले नाहीत. आदर्श पुत्र, पती, भाऊ, मित्र व राजा याचे दर्शन त्याने जीवनातून घडवले. जीवनातील प्रत्येक समस्येचे उत्तर राम आहे, असे प्रतिपादन डॉक्टर विश्वास यांनी केले.पाचशे वर्षानंतर अयोध्येत प्रभू राम स्थापन झाले आहे. हे काम सरकारने नाही तर सामान्यांच्या भावनेने व मदतीने झाले आहे. अशाच पद्धतीने मथुरा व काशीतही मंदिरे उभी राहतील असा विश्वास व्यक्त करून धर्म रक्षणासाठी प्रत्येकाने योगदान दिले पाहिजे, असे आवाहनही त्यांनी केले.

सुरेल भजनांनी वातावरण भक्तीमय

डॉ. विश्वास यांची राम कथा सुरू होण्यापूर्वी त्यांच्या समवेत आलेले गायक कलावंत नीरजा उपरेती, प्रियांशा शहा , अंकिशा श्रीवास्तव यांनी श्रीरामांचे सुरेल भजने सादर करून वातावरण भक्तिमय करत उपस्थित भाविकांना मंत्रमुग्ध केले. प्रा.प्रसाद बेडेकर व सुशील कुशलेंद्र यांनी सूत्रसंचालन केले. रामकथेच्या यशस्वीतेसाठी काका ट्रस्टचे राजेश भंडारी, नगरसेवक विकी जगताप, अनिल मुरकुटे, गणेश गोंडाळ, शशीकांत घीगे, अजित जगताप, अनुप काळे आदींसह शेकडो कार्यकर्त्यांनी नियोजन केले. उपस्थित सर्व भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

# नेवासा तालुका हादरला! ५० लाखांच्या भ्रष्टाचाराचा आरोप केल्याने मुख्याधिकाऱ्यांचा गोळीबाराचा बनाव?

उपाध्यक्षा शालिनी सुखधान यांचे पती संजय सुखधान यांनी नेवासा नगरपंचायतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यावर ५० लाख रुपयांच्या भ्रष्टाचाराचा गंभीर आरोप केला होता. या प्रकरणाचा पाठपुरावा सुखधान यांच्याकडून केला जात होता. हाच राग मनात धरून मुख्याधिकाऱ्यांनी सुखधान यांना अडकवण्यासाठी गोळीबाराचा बनाव रचल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे.

**मुख्याधिकाऱ्यांचा दावा विरुद्ध प्रत्यक्षदर्शींचा संशय**

मुख्याधिकाऱ्यांनी तोफखाना पोलीस स्टेशन (अहिल्यानगर) येथे दिलेल्या फिर्यादीनुसार: नेवासा येथील अत्यंत गजबजलेला खोलेश्वर गणपती मंदिर चौक येथे संजय सुखधान यांनी गाडी आडवी लावून मुख्याधिकाऱ्यांवर गोळी झाडली, ती त्यांनी खाली वाकून चुकवली. दुसरी गोळी झाडताना पिस्तुलमध्ये तांत्रिक बिघाड ( अडकल्याने) झाल्याने सुखधान तिथून पळून गेले. असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे

संशयाची सुई प्रशासनाकडे ? घटना १३ तारखेला घडल्याचे सांगितले जात असताना, गुन्हा ४-५ दिवसांनंतर का दाखल झाला. ✻ घटना नेवासा शहरात घडली असताना, गुन्हा नेवासा पोलीस ठाण्यात दाखल न करता अहिल्या नगर येथील तोफखाना पोलीस ठाण्यात का दाखल केला?. गजबजलेल्या खोलेश्वर चौकात संध्याकाळच्या वेळी अशी कोणतीही घटना घडली नसल्याचे स्थानिक नागरिक आणि व्यापाऱ्यांचे ठाम मत आहे.

**नेवासा शहराचा अभूतपूर्व आक्रोश**

आजच्या आंदोलनाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे संजय सुखधान यांच्यासाठी सर्व राजकीय पक्ष आपले मतभेद विसरून एकत्र आले. नेवासा बाजारपेठेतील व्यापाऱ्यांनी आपली दुकाने १००% बंद ठेवून या खोट्या गुन्ह्याचा निषेध केला.''एका प्रामाणिक कार्यकर्त्याचा आवाज दाबण्यासाठी जर प्रशासन खुनाचा प्रयत्न केल्यासारखे गंभीर गुन्हे खोट्या पद्धतीने दाखल करत असेल, तर हे लोकशाहीचे मरण आहे. हा गुन्हा रद्द होईपर्यंत आम्ही शांत बसणार नाही.'' आंदोलक व्यापारी व सर्वपक्षीय नेते.

**तहसीलदारांना निवेदन आणि इशारा**

मोर्चाच्या शेवटी तहसीलदार आणि पोलीस निरीक्षक यांना निवेदन देण्यात आले. ''जर संजय सुखधान यांच्यावरील हा खोटा गुन्हा तात्काळ मागे घेतला नाही, तर संपूर्ण जिल्हाभर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल,'' असा इशारा यावेळी देण्यात आला. या आंदोलनामुळे आणि सर्वपक्षीय एकजुटीमुळे सध्या प्रशासनाचे धाबे दणाणले आहेत.

याप्रसंगी नेवासा बाजार समितीचे सभापती नंदकुमार पाटील,आपचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र आघाव,उपनगराध्यक्षा सौ शालिनी संजय सुखधान,भाजप शहराध्यक्ष मनोज पारखे,भाजप नगरसेवक निरंजन डहाळे,काँग्रेसचे तालुका अध्यक्ष आण्णासाहेब पटारे,व्यापारी संघटनेचे कुणाल मांडण,युवा नेते गणेश चौगुले,शांताराम गायके,आरपीआयचे संजय बनसोडे, नगरसेवक स्वप्नील मापारी,संतोष राजगिरे,येदुभाऊ सोनवणे यांनी मनोगत व्यक्त केले.